आदर्श शेतकरी दि. 09/01/2023.

# पत्रकार संघाच्यावतीने मान्यवरांचा सत्कार



माहूर / प्रतिनिधी

पत्रकार दिनानिमित्त समाजामध्ये योगदान दिल्याबद्दल श्री देवदेवेश्वर संस्थानचे महंत मधूकरबाबा शास्त्री कविश्वर, वसमतकर मठाचे पिठाधीश साईनाथ महाराज, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक सुरेंद्र कुडे, महावितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता नंदकिशोर कोठे व पोलीस कर्मचारी शारदासूत खामनकर यांचा 'द पॉवर ऑफ मिडिया'चे वतीने तालुकाध्यक्ष विजय आमले व नंदकुमार जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नगरपंचायतच्या सभागृहात पार पडलेल्या सत्कार समारंभात नगराध्यक्ष फिरोज दोसाणी, उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड, पाणीपुरवठा सभापती विजय कामटकर, पत्रकार वसंत कपाटे, राज ठाकुर, कार्तिक बेहेरे, पवन कोंडे, अपिल बेलखोडे, बजरंगसिंह हजारी, राजु दराडे, सुरेश गीऱ्हे, सुरेखा तळनकर, पद्मा गीऱ्हे, यांच्यासहकर्मचाऱ्यांची उपस्थिती होत. सुरेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. नंदकुमार जोशी यांनी प्रास्ताविक केले. भाऊ पाटील यांनी आभार मानले.

दै. देशोन्नती दि. 09/01/2023.

# सिने स्टाईल लुटणाऱ्या मिस्त्रीसह दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : व्हिडीओगृह चालकाला सिनेस्टाइल लुटणाऱ्या तिघांना ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून १ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सतीश रमेशलाल राठौर (रा. वसरणी) यांचा व्हिडीओ सिनेमाचा व्यवसाय आहे. २६ डिसेंबरच्या रात्री ते घराकडे परत येत होते. धनेगाव चौकात (एम.एच.२६, ७६११) या क्रमांकाच्या दुचाकीवरून आलेल्या तिघांनी त्यांच्या हातावर चाकूने वार करून त्यांना थांबविले. त्यानंतर रोख ३ हजार ५०० रुपये, मोबाइल, दोन सोन्याच्या अंगठ्या असा एकूण ५९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणात नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा नोंद केला होता. खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शेख मुखीद ऊर्फ गुजर शेख नईम (रा. मोहम्मदिया कॉलनी, वाजेगाव), शेख इलीयास शेख खदीर (रा. मुदखेड रोड) आणि सय्यद आतिक सय्यद हुसेन (रा. मोहम्मदीया कॉलनी) या तिघांना पकडले. त्यांनी चोरीची कबुली दिली. सदर कारवाई पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## आरोपींमध्ये दोघे बेरोजगार

- पकडलेल्या आरोपींमध्ये शेख मुखीद हा मिस्त्री काम करतो. परंतु, गेल्या अनेक दिवसांपासून तो बेकार फिरत होता. तर शेख इलियास आणि सय्यद आतिक हे मात्र, कोणताही कामधंदा करीत नाहीत. झटपट पैसे कमविण्याच्या नादात त्यांनी एका व्हिडीओ चालकाला लुटले होते.

आकेदनगरी दि. 09/01/2023.

# जबरी चोरीतील तीनं आरोपींना अटक, १ लाख २८ हजारांचा मुद्देमाल जप्त

नविन नांदेड (प्रतिनिधी)- पोलीस स्टेशने ग्रामीण पोलीस आणि जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून दरोड्यातील तीन आरोपीकडून पुण्यातील वापरलेल्या हत्यारासह एकूण १ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून या प्रकरणी तीनं आरोपींनाअटक करण्यात आली असून या आरोपींकडून ईतर अनेक गुन्हा यांच्या शोध लागण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

फिर्यादी सतीश पी. रमेशलाल राठोड यांच्या फिर्याद वरून पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे गुर ७८१/२०२२ का ३९४,३४भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास पोउपनिरीक्षक बालाजी नरवटे हे करत आहेत. सदर गुन्हयात गेला मालाबाबत व अज्ञात आरोपीबाबत माहीती काढून आरोपी शेख मुखीद ऊर्फ गुजर पि.शेख नईम वय २२ वर्षं, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. मोहमदीया कॉलनी वाजेगाव ता.जि.नांदेड शेख इलियाज पि.शेख खदीर वय २१वर्ष. व्यवसाय बेकार रा. मुदखेड रोड वाजेगाव ता. जि. नांदेड, सय्यद आतीक पि सय्यद हुसेन वय १९वर्ष, व्यवसाय बेकार रा. मोहमदीया कॉलीनी वाजेगाव येथील सदर आरोपी दि.१जानेवारी २३रोजी अटक करुन त्यांचा दिनांक ७ जानेवारी २३ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेऊन त्यांचेकडे तपास करुन त्यांचेकडे वरील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपीतांकडुन आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे,संबंधीत कार्यवाही मध्ये पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोउपनिरीक्षक आनंद बिचेवार,व सहकाऱ्यांनी गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करून गुन्हे उघडकीस आणले आहेत.सदर उल्लेखनिय कामगीरी अधिकाऱ्यांकडून विशेष अभिनंदन केले.